महाराष्ट्र शासन
# शासकीय तंत्रनिकेतन, मिरज
माजी सैनिक वसाहत जवळ, विद्यानगर, मिरज- ४१६४१०
दुरध्वनी क्रमांक - कार्यालय (०२३३)२२३१४२३, फॅक्स -(०२३३) २२३१२६९
संकेत स्थळ - www.gpmiraj.ac.in email - gpmiraj@gmail.com

जा.क्र.शातंनिमि/आस्था/परिपत्रक/2020/९१२८

दिनांक :- 8 JUN 2020

**परिपत्रक**

विषय :- कोवीड - 19 चा प्रादुर्भाव होऊ नये याकरीता करणेत आलेल्याउपाययोजना व दक्षता घेणेबाबत.

संदर्भ :- महाराष्ट्र शासन आरोग्य विभाग मंत्रालय, मंुबई यांचे पत्र क्र.न्यायीक 2020/ प्र.क्र.58/ आरोग्य 5 दि. 30 मे, 2020

उपरोक्त विषयास अनुसरुन कोवीड - १९ चा प्रसार / प्रादुर्भाव होऊ नये या करीता शासनाने संदर्भीय पत्रान्वये कार्यालयांकरीता निर्देश व मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत. त्या अनुषंगाने सर्व अधिकारी / कर्मचारी यांनी संदर्भीय पत्रान्वये दिलेल्या सूचनांचे काटेकोर पालन करावे.

तसेच संदर्भीय शासन पत्रास अनुसरुन, संस्थेत येणारे अभ्यागत, अधिकारी , कर्मचारी व विदयार्थी यांचे आरोग्याच्या दृष्टीने काळजी घेण्यात येत असून, संस्थेत मुख्य प्रवेश व्दारा बाहेर हात धुण्यासाठी स्वतंत्र नळ व बेसिन, थर्मल स्कॅनिंग मशिन, ॲटोमेटिक सॅनिटरायझेशन मशिन, इ. गोष्टी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. त्याशिवाय सर्व विभागांना स्वतंत्रपणे हात धुण्यासाठी साबण, सॅनिटर, स्प्रे इ. साहित्य उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.

सबब सर्व अधिकारी / कर्मचारी यांना कळविण्यात येते की, त्यांनी संस्थेत प्रवेश करतेवेळी संस्थेच्या मुख्य प्रवेशव्दाराजवळ उपलब्ध करुन दिलेल्या थर्मल स्कॅनिंग मशिन, ॲटोमेटिक सॅनिटरायझेशन मशिन, इ. गोष्टींचा वापर करुनच संस्थेत प्रवेश करावयाचा आहे. तसेच संदर्भीय पत्रान्वये शासनाने दिलेले निर्देश व मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करावयाचे आहे.

(नि. पां. सोमजे )
प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन, मिरज.

प्रत :- माहिती व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.

1. मा. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, 412/ ई, शिवाजीनगर, पुणे.
2. सर्व विभाग प्रमुख / प्रभारी अधिकारी, शासकीय तंत्रनिकेतन, मिरज.
   2/- त्यांना असेही कळविण्यात येते की, संदर्भीय परिपत्रकातील निर्देश व सूचनांबाबत आपल्या विभागातील अधिकारी / कर्मचारी यांना अवगत करावे. तसेच आपल्या विभागास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या साहित्याचा उपयोग करुन आपल्या विभागातील स्वच्छता राखण्याच्या दृष्टीकोनातून योग्य ती खबरदारी घेणेची आहे.
3. प्रोग्रॅमर, शासकीय तंत्रनिकेतन, मिरज यांना संस्थेच्या संकेत स्थळावर प्रदर्शित करणेकामी.

Scanned with CamScanner